Review Of Research
ISSN:-2249-894X
Impact Factor : 3.1402(UIF)
Vol. 4 | Issue. 5 | Feb. 2015
Available online at www.lbp.world

# सोलापूर जिल्हयातील साखर उद्योग - प्रगती व समस्या

**प्रा.डॉ. व्हनबिंदगे विठ्ठल परसप्पा**
**छ. शिवाजी वरिष्ठ रात्र महाविद्यालय , सोलापूर.**

**प्रस्तावना :-**

जगात साखर उत्पादनात प्रथम क्रमांक असलेला एकमेव देश म्हणजे ब्रॉझील होय. तर भारताचा जगात साखर उत्पादनाचा दुसरा क्रमांक लागतो. साखर उत्पादनात दुसरा क्रमांक असला तरी उपभोगात मात्र प्रथम क्रमांक भारताचा आहे. साखर उद्योग ही राष्ट्र विकासाची सर्वात मोठी मोहिम आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात या उद्योगाचा वाटा इतर उद्योगाच्या तुलनेने सर्वात जास्त आहे. भारत हा अतिरिक्त लोकसंख्येचा देश म्हणून ओळखला जातो. त्याचबरोबर आपल्या देशाची गणना जागतिक पातळीवर अतिरिक्त साखर उत्पादन करणारा देश म्हणून ओळखला जातो.

**सोलापूर जिल्हा व साखर उद्योग :-**

देशातील सर्वात मोठा दुष्काळग्रस्त जिल्हा म्हणून सोलापूर जिल्हाकडे लक्ष केंद्रीत केले जाते, सोलापूर जिल्हात प्रामुख्याने एकूण ११ तालुक्याचा समावेश होतो. सोलापूर जिल्हाची सर्वाधीक प्रगती साखर उदयोगांवर अवलंबून आहे. जिल्हात कार्यरत असणाऱ्या साखर कारखान्याची संख्या २० एवढी आहे. जिल्हातील पावसाचे प्रमाण (५८ से.मी.) लक्षात घेता साखर कारखान्याची प्रगती अभ्यासण्यासारखी आहे. जिल्हातील एकूण शेतीक्षेत्रापैकी बागायत क्षेत्राचे प्रमाण १३ टक्के एवढे आहे. त्या बागायत क्षेत्रात ७५ टक्के पेक्षा जास्त पिक ऊसाचे आहे. सोलापूर जिल्हात जास्तीत जास्त लोकांना रोजगार देण्याचा सर्वात जास्त योगदान साखर कारखान्यांनी बजावला आहे.

**साखर कारखान्याची प्रगती :-**

**१) सर्वाधिक रोजगार :-** प्रत्यक्ष रोजगार १ लाख व अप्रत्यक्ष रोजगार ४ लाख असे एकूण ५ लाख लोकांना उत्पादन प्रक्रियेच्या विविध कामात काम करण्याची संधी मिळाली आहे. याचा परिणामी रोजगार देण्याच्या बाबतीत साखर कारखान्यांनी भरीव मदत करीत आहे.
**२) ऊस उत्पादक वर्गात वाढ :-** सोलापूर जिल्हातील कार्यरत साखर कारखान्याचा लागणारा ऊस(कच्चा माल) उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत प्रचंड वाढ झालेली आहे. व प्रत्येक बागायतदार ऊस उत्पादक शेतकरी होऊ पाहत आहे.
**३) संशोधन व तांत्रिक प्रगतीच्या संधी :-** सोलापूर जिल्हातील साखर कारखान्याची संख्या जास्त असल्याने ऊस उत्पादक प्रक्रियेत आवश्यकते तांत्रिक व संशोधनात्मक बदल घडून येत आहे. याचा फायदा नियमित उत्पादन प्रक्रिया व सुधारीत गुणात्मक उत्पादन दर्जा सुधारु शकतो.
**४) स्पर्धा शक्तीत वाढ :-** जागतिकीकरणाला सामोरे जाताना जिल्हातील प्रत्येक साखर कारखान्यांनी आपले उत्पादन क्षमता व गुणवत्ता, किमान उत्पादन खर्च इत्यादी वर लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. याचा फायदा वर्तमान व भविष्यकाळात मिळू शकतो.
**५) साखर उत्पादनावर आधारित विविध उदयोगात वाढ :-** साखर कारखान्यात ऊसापासून साखर तयार करताना जे पदार्थ बाहेर टाकाऊ स्वरुपात बाहेर फेकले जाते. त्या पदार्थावर रासायनिक व आधुनिक प्रक्रिया करुन विविधि उपपदार्थ तयार करण्यासाठी साखर कारखान्याची स्थापना केली जाते. परिणामी पुरक उद्योगाची संख्या वाढून प्रगतीला चालना मिळते.

**६) अर्थ व भांडवल पुरवठयाची हमी :-** "हमी शासनाची, होईल प्रगती साखर उद्योगाची" या विधानानुसार महाराष्ट्रातील सरकारांनी सर्व बाजूने साखर कारखान्याच्या विकासाकरीता फार मोठी मदत करण्याची हमी घेतली आहे. याचा परिणाम म्हणून साखर उद्योगाला चालना मिळाली आहे.

**७) जलसिंचनाच्या सुविधा :-** देशातील सरकारची साखर कारखान्याची जलसिंचनाच्या सोयीत वाढ करुन ऊस उत्पादन खालील क्षेत्रात फार मोठी वाढ करीत आहे म्हणजेच भविष्यात सहकारी साखर कारखाने व अडचणीत येणार नाही.

**८) साखर विक्री धोरण :-** देशातील सरकारने साखर विक्री धोरणात फार मोठा बदल केला आहे. तो बदल म्हणजे सुरुवातीच्या काळात ३५ टक्के नव्या सरकारी साखर विक्री धोरण म्हणजे १० टक्के लेव्ही ९० टक्के खुल्या बाजारात विक्रीस परवाना त्यामुळे भविष्यात कारखान्यास चांगले प्रगतीचे दिवस येणार आहे हे निश्चितच आहे.

**९) वाहतूक क्षेत्रात सुधारणा :-** ऊस व साखर व इतर उत्पादीत वस्तू योग्य वेळी आवश्यक त्या ठिकाणी वितरण करण्यासाठी ग्रामीण रस्ते, बाजारी रस्ते इत्यादी फार मोठी सुधारणा केली आहे. त्याचा फायदा वर्तमान काळात व भविष्य काळात होवू शकतो. सोलापूर जिल्हातील साखर कारखान्याची प्रगती झाली असले तरी काही समस्या आजही तश्याच आहेत. त्या पुढीलप्रमाणे :-

**१) आजारी साखर कारखाना :-** सोलापूर जिल्हात २० साखर कारखाने असून आणखीन काही साखर कारखाने नव्याने स्थापन होत आहे. म्हणजेच सोलापूर जिल्हातील साखर कारखान्यांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली तरी त्याच्या गुणवत्तेत मात्र वाढ झाली नाही. आजही कित्येक साखर कारखाने आजारी आहेत.

**२) वाढता कर्जाचा बोजा :-** सोलापूर जिल्हातील अनेक साखर कारखाने कर्जात बुडाले आहेत. साखर कारखाने कर्जबाजारी झाल्याने तोटा सहन करुन ऊसाचे गाळप करीत आहे.

**३) असमतोल विकास :-** जिल्हयातील साखर कारखान्याचा समतोल विकास झाला नाही. नदीकाठच्या भागात पाण्याच्या सोयी असलेल्या भागात साखर कारखान्याचा विकास झाला. तरी ज्या भागात पाणीपुरवठयाच्या सोयी नाही, त्या भागात म्हणावा तसा कारखान्याचा विकास झाला नाही.

**४) राजकारणाचा शिरकाव :-** सहकारी साखर कारखान्यात राजकारणाचा शिरकाव मोठया प्रमाणात झाल्याचे पहावयास मिळतात. राजकारण आणि निवडणूका यामुळे कारखान्यात दोन गट निर्माण होऊन तणाव निर्माण होतो. परिणामी साखर कारखान्यांच्या प्रगतीत अडथळा निर्माण होतो.

**५) कच्च्या मालाची कमतरता :-** जिल्हयातील साखर कारखान्यांच्या संख्येत वाढ होत असल्याने ऊस मिळविण्यासाठी साखर कारखाने एकमेकांशी स्पर्धा करीत आहेत. परिणामी ज्या कारखाने उसाला अधिक भाव देण्यात तयार होतो. त्या कारखान्यास शेतकरी आपले ऊस पाठवितात. परिणामी उसाच्या कमतरतेमुळे साखर कारखाने बंद ठेवण्याची वेळ कारखानदारांवर येतो.

**६) ऊस लागवडीबाबत नियोजनाचा अभाव :-** साखर कारखानदारांनी ऊस लागवडीबाबत नियोजन करत नाहीत. शेतकरी अज्ञानी असल्याने ऊस लागवड एकदम करतात. नियोजनाच्या अभावामुळे एकाच वेळी सर्व भागातील ऊसाचे गाळप करणे अशक्य बनते.

**७) दुय्यम उत्पादनाबाबत उदासिनता :-** साखर कारखानदारांना भांडवलाच्या अभावामुळे दुय्यम उत्पादनाबाबत उदासिनता आहेत. दुय्यम उत्पादनाकडे साखर कारखाने दुर्लक्ष करतात. सोलापूर जिल्हयातील काही साखर कारखान्यांच्या समोर समस्या जरी असल्या तरी एकूण २० साखर कारखाने मिळून वर्षअखेरीस ३०.४९,१७७ मे.टन उसाचे गाळप करून २८,७३,२४० क्विंटल साखर उत्पादन केले असून साखरेचा सरासरी उतारा ९.६२ टक्के असून दिवसेंदिवस या उताऱ्यात वाढ होत आहे.

सोलापूर जिल्हयातील साखर कारखान्यासमोर काही समस्या असल्यातरी त्या समस्या सोडवण्यासाठी काही उपाययोजना पुढीलप्रमाणे :-

१) जिल्हयातील साखर कारखान्यांच्या गुणक्तेत वाढ केली पाहिजे.
२) सुशिक्षित व्यवस्थापक वर्ग नेमावा. व्यवस्थापकीय दोष कमी करावा.
३) आजारी साखर कारखान्यांना शासनाने मदत करावा.
४) आधुनिक यंत्राच्या साहय्याने गाळप करून उत्पादन खर्च कमी करावा.
५) शासनाने साखरेच्या किमती स्थिर ठेवावे.
६) शेतकऱ्यांना वेळोवेळी मार्गदर्श करावे.
७) ऊस वाहतूक सोयीत वाढ करावे.
८) दुय्यम उत्पादने (कागद, अल्कोहोल, विज निर्मिती) निर्माण करावे.

९) साखर कारखान्यावर प्रशासकीय नियंत्रण ठेवावी.
१०) गोडाऊनच्या सोईत वाढ करावी.

वरील प्रकारे उपाययोजना केल्यास सोलपूर जिल्हयातील साखर कारखान्यांचा विकास होण्यास मदत होईल.

**संदर्भ ग्रंथ :-**

१) भारतीय अर्थव्यवस्था - भोसले, काटे
२) व्यापारी मित्र २००९-१०
३) लोकराज्य २००९-१०
४) साखर डायरी २०१०-११
५) ॲग्रो वन २०१०-११
६) विविध साखर कारखान्यांचा वार्षिक अहवाल
७) योजना २०१०-११.